महाराष्ट्र पोलीस
पोलीस अधीक्षक, पालघर यांचे कार्यालय
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत संकुल, मोरेकुरण रोड, पालघर, बोईसर, रोड,
कोळगांव (प.) जिल्हा – पालघर. दुरध्वनी – ०२५२५-२५११००
E-mail sp.palghar@mahapolice.gov.in

जा.क्र.पोअपा/आस्था-१/तात्पुरती/सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द// 18 /२०२४ दिनांक :- 15 /०१/२०२४

विषय :- पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उप निरीक्षक या संवर्गातील तात्पुरती सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

---०००---

पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई/पोलीस नाईक/पोलीस हवालदार/ सहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांची सन-२०२४ ची तात्पुरती सेवाजेष्ठता यादी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब जुन २२, २०२१/आषाढ १. शके १९४३, दि.२१/०६/२०२१ नुसार प्रत्येक्ष नियुक्ती दिनांक तसेच पदोन्नती ज्येष्ठतेचा दिनांकानुसार तयार करुन www. palgharpolice. gov. in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येत आहे. सदर सेवाजेष्ठता यादी सर्व विभागीय पोलीस उप अधिकारी/प्रभारी अधिकारी पो. स्टे./शाखा/पोलीस मुख्यालय पालघर यांना त्यांच्या ई-मेल आयडीवर पाठविण्यांत आली आहे. सदरचे पत्र दररोज सर्व पोलीस अंमलदारांना हजेरीवर ०५ दिवस वाचुन दाखवावे. तसेच जे पोलीस अंमलदार दिर्घ रजेवर/गैरहजर आहेत त्यांना प्रसिध्द करण्यांत आलेल्या यादीचे अवलोकन करणेबाबत समज पत्र देवुन त्यांची नोंद आपले आस्थापनेवर ठेवावी व एक प्रत या कार्यालयास सादर करावी. तसेच सदर यादीतील अंमलदारांचे स्थान निश्चितीबाबत सर्व पोलीस अंमलदाराच्या निदर्शनास आणावे. सेवाजेष्ठता यादया वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन पोलीस स्टेशनच्या नोटीस बोर्डावर लावुन सर्व अंमलदारांच्या निदर्शनास आणुन दयावे.

सर्व पोलीस अंमलदार यांनी सदर सेवाजेष्ठता सुचीमध्ये नमूद केलेली त्यांची नियुक्ती मार्ग /जन्म तारीख/ प्रवर्ग/प्रत्येक्ष रुजू दिनांक/सेवाजेष्ठता दिनांक/सेवानिवृत्तीचा दिनांक/शैक्षणिक अर्हता बरोबर असल्याची खात्री करुन त्यामध्ये काही उणीवा/चुका असल्यास अगर स्थान निश्चितीबाबत अडचण असेल व त्याबाबतचे आक्षेप लेखी स्वरुपात तात्काळ संबधीत प्रभारी अधिकारी यांचेकडे सादर करुन, संबधीत अंमलदार यांचे आक्षेप योग्य आहे अगर कसे? याबाबत आपले अभिप्रायासह सदर आक्षेप अर्ज दि.१७/०१/२०२४ पावेतो इकडील कार्यालयास सादर करावेत.

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पो-५ ब, दि. २६/१०/२०१७ मधील नियम क्र.०५ सेवाजेष्ठता निश्चित करणेबाबत राज्य पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उप निरीक्षक दर्जापर्यन्तच्या पोलीस अंमलदारांच्या घटक बदलीनंतर बदली झालेल्या घटकात त्या पोलीस अंमलदाराची सेवाजेष्ठता त्याची महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस शिपाई या पदावरील भरती दिनांक ग्राहय धरण्यात येवुन त्या दिनांकाच्या वर्षी घटक बदली झालेल्या पोलीस शिपाई या पदावर भरती झालेल्या त्या वर्षी ज्येष्ठतेत सर्वात कनिष्ठ असलेल्या शेवटच्या पोलीस शिपाई यांचे खाली निश्चित होईल तसेच ज्या अंमलदारांचे एकापेक्षा अधिक वेळा घटक बदली करण्यांत आलेली आहे. अशा अंमलदारांची सेवाजेष्ठता देखील याच निकषानुसार निश्चित होईल.त्याप्रमाणे शासन निर्णय पारीत झालेल्या दिनांकापासुन आंतरजिल्हा बदलीवर पालघर जिल्हा आस्थापनेवर हजर होणा-या पोलीस अंमलदाराची सेवाजेष्ठता निश्चित करणेबाबत कार्यवाही अवलंबण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्र. पीएम-०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ ब मुंबई दि. १२/ ०५/ २०२१ व शासन शुध्दीपत्रक पीएमएन-०३१४/२०३/प्र. क्र.६८ पोल-५ ब, दि. २९/११/२०२२ अन्वये राज्य राखीव पोलीस बलातुन जिल्हा पोलीस घटकात बदलुन येणा-या अंमलदारांची सेवाजेष्ठता निश्चित करण्यासाठी त्यांचा भरतीचा दिनांक ग्राहय धरण्यात येवुन,त्यानुसार त्यांची सेवाजेष्ठता निश्चित करुन राज्य राखीव बलातील बदलुन येणारा अंमलदार ज्या वर्षी राज्य राखीव पोलीस दलात भरती झाला असेल त्या वर्षातील

Scanned with AnyScanner

जिल्हा पोलीस दलात भरती झालेल्या सर्व अंमलदारांच्या सर्वात शेवटी त्यांला सेवाजेष्ठता दिली जाईल. व त्या वर्षात त्याच्या प्रवर्गातील अंमलदार ज्या पदावर कार्यरत आहेत. त्या पदावरच तो नियुक्तीस पात्र राहिल असे निर्देश दिलेले आहेत.

सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे नेमणुकीतील पोलीस शिपाई/पोलीस नाईक/ पोलीस हवालदार/ सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांचे नांव सेवाजेष्ठता यादीत असल्याबाबत खात्री करुन त्यांबाबतचे प्रमाणपत्र दि. २२/०१/२०२४ रोजी न चुकता इकडील कार्यालयात हस्ते सादर करावे. तसेच ज्या पोलीस अंमलदारांचे नांव सेवाजेष्ठता यादी समाविष्ठ नाही. अशा अंमलदारांचे नांवे तात्काळ इकडील कार्यालयास सादर करावीत.

तात्पुरती सेवाजेष्ठता यादीत प्रसिध्द केलेल्या अंमलदारांपैकी एखादा अंमलदार आंतरजिल्हा बदली/ सेवेतुन कमी/ वडतर्फ/सक्तीने सेवानिवृत्त/मयत झाले असल्यास त्याबाबत माहिती संबंधीत प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयात उलट टपाली सादर करावी. त्यानंतर सदर माहितीचे आधारे सदर सेवाजेष्ठता यादीत अदयावत करुन संबधीत पोलीस अंमलदारांची सेवाजेष्ठता यादीतील स्थान निश्चित करण्यांत येईल. यांची सर्व संबधीत पोलीस अंमलदार यांनी नोंद घ्यावी. तसचे दि.२२/०१/२०२४ रोजीनंतर प्राप्त झालेले कोणतेही अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

सदर सेवाजेष्ठता यादी तात्पुरती स्वरुपाची असुन, संबधीत पोलीस अंमलदार यांच्याकडुन प्राप्त झालेल्या आक्षेपानुसार सदर यादीत आवश्यक दुरुस्ती करुन, त्याबाबत सुधारीत सेवाजेष्ठता यादी www. palgharpolice. gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल.

(बाळासाहेब पाटील )
पोलीस अधीक्षक, पालघर

प्रति,

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, जिल्हा पालघर
सर्व प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे/ शाखा, जिल्हा पालघर
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय पालघर

प्रत योग्य त्या कार्यवाही करीता

प्रभारी अधिकारी, सायबर सेल पालघर

२/- सदर सेवाजेष्ठता यादया सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी/प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी/रापोनि, पोलीस मुख्यालय पालघर तसेच सर्व पोलीस अंमलदारांचे ई-मेल आयडीवर प्रसिध्द करण्यांत यावी.

Scanned with AnyScanner